ISSN-2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Issues– I Jan – Feb, 2025

OPEN ACCESS Original Research Article

# समृद्धीच्या सावलीत : गरीबी आणि असमानतेचे वास्तव

* विष्णु सुदामराव आंधळे

* एम.ए. अर्थशास्त्र.

**प्रस्तावना :**

भारत हा जगातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या अर्थव्यवस्था पैकी एक आहे. 2022 मध्ये भारतीय अर्थव्यवस्था 5 व्या क्रमाकांची होती. आणि क्रयशक्ती नुसार 3 क्रमाकांची होती. तरीही इथे कोट्यावधी लोक गरीबीच्या छायेत जीवन जगतात. प्रश्न असा आहे की, आर्थिक प्रगतीचा लाभ सर्वापर्यंत पोहचतो आहे का तो फक्त काही विशिष्ट गटापर्यंत मर्यादित आहे. गरीबी आणि असमानता ही केवळ आर्थिक समस्या नाहीतर ती सामाजिक आणि राजकीय पातळीवर परिणाम करणारी बाब आहे. एकीकडे सरकार आणि जागतिक संस्थानी गरीबी निमूलन विविध उपाय योजना राबल्या आहेत पण तरीही विषमता वाढ्यत चालली आहे जर देश समृद्ध होत असेल तर गरीबी कमी का होत नाही.

**Copyright © 2025 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

**उद्देश :**

1. हा निबंध गरीबी आणि असमानतेच्या विविध पैलूचे विश्लेषण करले, गरीबीच्या संकल्पणे पासुन तिचा कारणापर्यत असमानतेच्या वाढत्या समस्या पासून ते संभाव उपाययोजना खरच परिवर्तन कुढे शक्य आहे ? यांच्या शोध घेण्याच्या प्रयत्न करेल.
2. ही समस्या निर्माण का झाली ? तिचे दिर्घकालीन परिणाम काय आहेत आणि त्यावर प्रभावी उपाय काय असू शकतात.

**संशोधन पद्धती:**

प्रस्तुत शोध निबंध हे दुय्यम साधन सामृग्रीवर आधारलेला आहे. विविध संदर्भ ग्रंथ नियतकालीके मासिके भारताया आर्थिक सर्वेक्षण अहवाल तज्ञानाचे शोध निबंध व आंतरराष्ट्रीय अहवाल यामधून माहितीचे संकल्प करून प्रस्तुत लेख तयार करण्यात आला.

**गरीबी आणि असमानतेची संकल्पना :**

भारता सारखा विकसनशील देशात गरीबी आणि असमानता या केवळे आर्थिक समस्या नसून सामाजिक आणि राजकीय स्थैयावर परिणाम करणाऱ्या गंभीर बाबी आहेत

**गरीबी म्हणजे काय :** गरीबी म्हणजे केवळ पैशाची कमतरता नव्हे तर मुलभूत गरजाची न पुरतता होणे गरीबी असलेल्या लोकांना

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Issues– I Jan – Feb, 2025

OPEN ACCESS Original Research Article

पुरेशे अन्न चांगले शिक्षण आरोग्य सेवा आणि निवारा मिळत नाही.

1. **निर्धनता** [ Absolute poverty]

रोजच्या जगण्यासाठी आवश्यक अन्न वस्त्र निवारा गोष्टीची टंचाई

**गरीबीची व्याख्या**

- गरीबी म्हणजे लोकाच्या मुलभूत गरजाची असंवेदनशीलता आणि त्या गरजाची अनदेखी कारणे होय (अमर्त्य सेन)
- गरीबी एक अशी अमानवीय स्थिती आहे. जिवंत व्यक्तीला समाजात समान आधिकार देण्यापासून वंचित करते (माहत्मा गांधी)

**ग्रामीण आणि शहरी गरीबीचे प्रमाण** (2011-12 ते 2023-24)

| **वर्ष** | **ग्रामीण गरीबी %** | **शहरी गरीबी%** |
|---|---|---|
| 2011-12 | 25.07 | 13.07 |
| 2022-23 | 7.02 | 4.06 |
| 2023-24 | 4.86 | 4.09 |

स्रोत : SBI रिसर्च रिपोर्ट

**असमानता म्हणजे काय :**

असमानता म्हणजे समाजातील लोकामध्ये असलेल्या संधी आणि संपतीतील तफावत होय. आर्थिक असमानता, शैक्षणीक असमानता, लैगिक असमानता, सामाजिक असमानता ग्रामीण शहरी असमानता गरीबी श्रीमंत असमानता.

**असमानतेच्या व्याख्या:**

असमानता सर्वात मोठा धोका आहे [ अमर्त्य सेन]

असमानता एक सामाजिक संवरचना आहे [ कार्ल्स मार्क्स ]

असमानता हा केवळ धनाच्या विभाजनाची समस्या नाही तर ती जीवतांच्या सर्व पैलु मध्ये असमानतेची समस्या आहे. [ माँहत्मा गांधी ।

**ग्रामीण आणि शहरी उपभोग असमानता** (2023-24)

| **श्रेत्र** | **गिनी गुणांक**2022-23 | **गिनी गुणांक** 2023-24 |
|---|---|---|
| ग्रामीण | 0.28 | 0.27 |
| शहरी | 0.36 | 0.31 |

**स्रोत : दृष्टी आएएस**

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Issues– I Jan – Feb, 2025

OPEN ACCESS Original Research Article

**आर्थिक असमानता : गिनी गुणांकानुसार [वर्षानुसार बदल ]**

| श्रेत्र | गिनी गुणांक |
|---|---|
| 2011-12 | 0.34 |
| 2022-23 | 0.30 |
| 2023-24 | 0.29 |

स्त्रोत : दुस्टी आयएएस

**गरीबी आणि असमानता यांच्या परस्पर संबंध:**

गरीबीमुळे असमानता वाढते गरीब लोकांकडे शिक्षण आणि कौशल्य नसल्यामुळे चांगली नौकरी मिळत नाही. परिणामी संपत्ती काही ठरावीक लोकाकडे साचते असमानतेमुळे गरीबी कायम राहते. समाजातील काही गटाकडे सर्वाधिक संधी असतात इतर गट मागे पडतात. त्यामुळे गरीब लोकपुढे येऊ शकत नाही. उच्च आर्थिक वाढ असुनही गरीबी कमी होण्याचे कारण असमानता आहे.

1. उत्पन्न वाटपातील असमानता शिक्षण आरोग्य जमीन आणि रोजगारांच्चा संधी उपलब्ध नसल्याने गरीब वर्ग आधिक गरीब का राहतो.
2. राजकीय आणि सामाजिक असमानता गरीब लोकांना राजकीय सत्तेत भागीदारी मिळत नाहीं त्यामुळे त्यांच्या समस्या दुर्लक्षीत राहतात.
3. संपत्तीचा वारसा श्रीमंताची पुढील पिढी श्रीमंत राहते तर गरीबाची पिढ्यान पिढ्या गरीबी चालू राहते
4. अर्थसंकल्प आणि सरकारी धोरणे गरीबांना मदत करणाऱ्या योजना मंध्ये भ्रष्टाचार आणि अकार्य समता असल्याने त्याचा पुर्ण फायदा गरीबा पर्यंत पोहचत नाही.

**निष्कर्ष :**

गरीबी आणि असमानता यांचा संबंध असुन असमानतेमुळे गरीबी अधिक गडद होते आणि गरीबी मुळे असमानता आधिक वाढते.

**भारतातील गरीबी आणि असमानतेची कारणे :**

**ऐतिहासीक कारणे :**

संपत्तीची तुट 1757 ते 1947 दरम्यान भारतातून 45 ट्रिलीयन डॉलर इतकी संपती लुटनाच्या अंदाज ब्रिटनला पाठवली. (Economist उत्सव पटनाईक)

**स्थानीक उद्योगाच्या ऱ्हास :**

19 व्या शतकात भारताचा जागातिक GDP मध्ये वाटा 24% होता. तो 1947 मध्ये केवळे 4 टक्के झाला.

भांडवलशाही अर्थव्यवस्थमुळे असमानता वाढली 1951 साली भारतात गरीबी दर 70% होता. स्वातंत्र्यानंतर ही असमानता मोठ्या प्रमाणात कायम राहिली

**आर्थिक कारणे :**

**अस्थीर रोजगार आणि बेरोजगारी :** भारतात 60% बेरोजगार दर PLFS 2023 नुसार त्यामध्ये 15-29 वयोगटातील बेरोजगार 12%, च्या आसपास होता कंत्राती आणि अनऔपचारिक क्षेत्रात काम करणाऱ्या कामगाराची संरखा 80% पेक्षा जास्त आहे. सेटर फॉर मॉनिटरिंग इंडियन इकॉनॉमी ((MIE) आकडेवारीनुसार सप्टेंबर 2023 मध्ये

बेरोजगारीचा दर 7,09% होता ग्रामीण भागातील बेरोजागारी दर शहरी भागापेशा जास्त आहे.

**महागाई आणि वेतनातील विसंगती :** 2023 मध्ये अन्न धान्य महागाई दर 7.5 % पर्यंत पोहचला पण सामान्य मंजूरच्या वेतन वाढ दर फक्त 3.4% होता भारताच्या GDP मध्ये शेती क्षेत्राचा वाटा 17.7% होता. 1990-91 तो 35% होता. तो 2022 मध्ये 15% पर्यंत घसरला. देशातील एकूण लोकसंख्येचा 50% आजही शेतीवर अवलंबुन आहे. 2019 पासून दररोज सरासरी 28 शेतकरी आत्महत्या करत आहेत. (NCRB Report)

**सामाजिक कारणे :**

जातीय आणि लैगिंक असमानता - SC/ST समाजातील 50% पेक्षा जास्त कुंटुब आजही दारिद्रय रेषेखाली आहेत. स्त्रीयांचे मासिक सरासरी उत्पन्न पुरुषाच्या 22% कमी आहे. महिलाची समाजातील भागीदारी भारतात 25% आहे. जी चीन मध्ये 61% आणि अमेरिकेत 56% आहे.

ग्रामीण आणि शहरी तफावत शहरी भागात सरासरी मासिक 20000 आणि ग्रामीण भागात 10200 आहे. भारतात ग्रामीण भागात 68.84% लोकसंख्या ग्रामीण भागात राहते. 75% गरीब लोक ग्रामीण भागात राहतात.

**शिक्षणातील असमानता:**

सरकारी शाळामध्ये शिक्षण घेणाऱ्या मुला पैंकी फक्त 35 % मुलाना 5वी पर्यंत साधी वाचन क्षमता मिळते.(ASER Report2023)

उच्च शिक्षणात गरीब आणि मागासवर्गीय विद्यार्याच्या सहभाग 20-25 % इतकाच असतो.

**आरोग्य विषयक कारणे :**

कुपोषण आणि सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेचा अभाव - भारतातील निम्यापेक्षा जास्त महिलामध्ये रक्ताक्षय आहे. 5 वर्षाखाली 35% मुले कुपोषित आहेत. NFHS-52023 सरकार GDP च्या फक्त 20% आरोग्यावर खर्च करते जागतिक सरासरी पैसा 50% पेक्षा कमी आहे. साथीच्या रोगराहीचा परिणाम कोविड 19 नंतर 23 कोटी भारतीय गरीबीत ढकलेले गेले[ Azim preji university Report 2021

लॉंकडाऊन नंतर 12 कोटी लोकांनी नौकऱ्या गमावल्या (CMIE Report)

**धोरणात्मक कारणे :**

1. सरकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी नाही भारतातील 60% गरीब लोकांना pm-kisan योजनेचा लाभ मिळत नाही.
2. मनरेगा अंतर्गत मंजुरी केलेल्या लोकांना 100 दिवसापैकी फक्त 52 दिवस काम मिळते.
3. खाजगीकरण आणि जागतिकीकरण - 1991 नंतरच्या खाजगीकरणामुळे काही उद्योग वाढले पण छोटे व्यवसाय बंद पडले.
4. MSME क्षेत्रासाठी सरकार GDP च्या फक्त 4% इतकच आर्थिक सहाय्य करते.

**सामाजिक माध्यमाचा प्रभाव:**

इंस्टाग्राम फेसबुक सोशल मिडीया सारखा समाज माध्यमावर आपला आकर्षित आणि दिखाऊ जीवन शैली दाखवतात. गरीबलोक हीच समृध्दी पाहुन आपल्या जीवनमाणाची

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Issues– I Jan – Feb, 2025

OPEN ACCESS Original Research Article

तुलना करतात ज्यामुळे आर्थिक आणि मानसिक तनाव निमाण होतो.

गरीब लोकांच्या वास्तविकता आणि सोशल मीडीयावरील दिखावयाची असमानता त्यांना एका सामाजिक दबावाखाली आणते. डिजीटल युगात विशेषत : एन्फ्कुएन्सर संस्कृतीमुळे लोकांमध्ये एक दिखावटी जीवनमान प्रकट होत आहे.

**व्यक्तीगत Branded Indentity आणि ऑनलाइन समृद्धी:** डिजिटल माध्यमांवर व्यक्तीगत ब्रॅड तयार करणे आणि अल्पप्रचार ही एक सामान्य प्रथा बनली आहे. अनेक लोक आपली लाइफस्टाइल संपती आणि वैयक्तिक यशदर्शवतात जे इतराना दिखावे आणि त्याची नकल करण्यास प्रवृत करते. अशा प्रकारच्या संस्कृती मध्ये गरीब लोकांनी यशस्वी होण्यासाठी अनेकदा चुकीचे निर्णय घेतले, जसे की आर्थिक कर्ज घेणे किंवा सोशल मिडीयावर नक्कल करणे

**गरीबी आणि असमान तेचे परिणाम :**

सामाजिक माध्यमाचे परिणाम, मानसिक आरोग्यावर परिणाम, सोसल मिडीया लोकांना अत्याधिक आर्थिक आणि सामाजिक तुलना करायला प्रवृत्त करते ते आपल्या जीवन शैलीतील असमानता पाहुन तनाग्रस्त होतात.

**समाजातील विषतमता वाढणे:**

सामाजिक भेदभाव आणि भ्रामक जीवनशैली वाढीस लागते. सामाजिक बहिष्कार आणि विद्वेष : दिखावा करणारा समाज गरीब आणि कमी सुसज्ज असलेल्या लोकांना सामाजिक बहिष्कार विद्वेष याला प्रोत्साहान देतात.

**सामाजिक परिणाम** - शिक्षणाचा अभाव गरीबी आणि असमानता मुलाना गुणवत्ता पुर्ण शिक्षणापासून वंचित ठेवते.

**आर्थिक परिणाम** – संपत्तीचे असमान वितरण भारतातील गिनी गुणांक 35 आणि आर्थिक विषमता सुचित करतात की गरीब श्रीमंत दरी अधिकच वाढत आहे.

**नौकऱ्याच्या संधी कमी होणे** - बेरोजगारी दर आणि असुरक्षित नौकऱ्या आरोग्यावर परिणाम कुपोषण प्रभाव दवाखान्यांमध्ये असमानता.

**राजकीय परिणाम** - राजकारणात असमानता प्रतिनिधित्व आणि सामाजिक असंतोष गरीबी आणि असमानता एकमेकांशी जोडलेला समस्या आहेत. जी भारतात सामाजिक आर्थिक आरोग्य आणि राजकीय क्षेत्रात गंभीर परिणाम करतात. यामुळे संपत्तीचे असमान वितरण शिक्षणाची कमतरता आरोग्य सेवा अभाव आणि राजकीय अंसतोष निर्माण होतो. या समस्याच्या निराकरण्यासाठी प्रभावी धोरण्यांची आवश्यकता आहे.

**उपाय आणि शिफारशी :**

1. **शासकीय उपाय Government solutions**

   गरीबी मुक्त विविध योजनेच्या विस्तार : केंद्र सरकारने विविध योजनाचे जाळे तयार केले उदा. प्रधानमंत्री गरीब कल्याण योजना (PMGKY) प्रधानमंत्री आवास योजना आणि मनरेगा यांचे प्रभावी कार्यान्ययन आणि त्वरित वितरण गरजेचे आहे. शासनाच्या योजनामध्ये पारदर्शकता योजनातील फसवणूक आणि भ्रष्टाचार थांबवण्यासाठी सर्व योजना पारदर्शकता सुनिश्चित करणे आवश्यक आहे.

2. **शिक्षण आणि कौशल्य विकसन Education and skill development**

   मानव संसाधन विकास शाळामंध्ये दर्जेदार शिक्षकांची

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Issues– I Jan – Feb, 2025

OPEN ACCESS Original Research Article

नियुक्ती करणे विद्यार्थ्यांना डिजिटल शिक्षणाची सुविधा देणे आणि असा इन्फास्ट्रक्चर तयार करणे की गरीब मुलांना परिष्कृत शिक्षणाचा लाभ मिळू शकेल.

3. **स्वास्थ आणि कुपोषण** Health and Nutrition

**सार्वजनिक आरोग्य सेवा** : गरिबांना आरोग्य सेवामध्ये आधिक प्रवेश देण्यासाठी कमी किमतीत उपचार उपलब्ध करून देणारे रुग्णालय आणि आरोग्य केंद्रे वाढवावेत.

**कुपोषणावर नियंत्रण** : ग्रामीण भागामध्ये अन्न सुरक्षा योजनांचा विस्तार करणे आणि अन्न गुणवता सुनिश्चित करणे.

4. **आर्थिक समावेश आणि रोजगार** Economics Inclusion and Employment

शेती आणि ग्रामीण रोजगार ग्रामीण अर्थव्यवस्थेसाठी आधिक रोजगार निर्मिती करून गरीब कुंटुंबाना त्यांच्या श्रमाचे योग्यमुल्य मिळवून देणे स्मॉल अँन्ड मिडियम एंटरप्रायझेस SMES वाढविणे त्यामुळे आधिक रोजगार उपलब्ध होईल आणि गरीब व्यक्तीच्या व्यवसायांची गुणवता सुधारणा येईल.

5. **राजकीय आणि सामाजिक जागरूकता** political and Social Awareness

गरीब लोकांचे राजकीय प्रतिनिधित्व सुनिश्चित करणे आणि त्यांना आशा आणि मार्गदर्शन करणे जातीय भेदभाव आणि महिलांच्या हक्कावर जागरुकता निर्माण करणे.

**निष्कर्ष** : conclusion

1. **गरीबी आणि असमानता एक जागतिक समस्या आहे** : भारतासारख्या विकसनशील देशात गरीबी आणि असमानता हे अत्यंत गभीर मुद्दे आहेत आणि यांच्या परिणाम समाजाच्या सर्वस्तरावर होतो. भारतासारख्या विकसनशील देशात गरीबी आणि असमानता हे अत्यंत गंभीर मुद्दे आहेत. आणि यांच्या परिणाम समाजाच्या सर्वस्तरावर होतो आर्थिक सामाजिक आणि आरोग्य समस्यामध्ये गडबडे निर्माण करतात.

2. **कारण आणि परिणामांचा सुसंगत विचार करणे महत्वाचे** : प्रत्येक कारण आणि त्यांच्या परिणामांचा गंभीर आणि सुसंगत विचार करूनच यावर प्रभावी उपाय तयार होऊ शकतात. देशाच्या विकासासाठी यावर लक्ष देणे आवश्यक आहे.

3. **सर्वसमावशेक उपायाचा अवलंब करणे** : शासन सामाजिक संस्था आणि समाजातील प्रत्येक घटकांनी एकत्र येउन गरीबी आणि असमानतेवर लक्ष देणे, आवश्यक आहे. नवीन धोरणे सर्वसमावेशक योजनांचे प्रभावी कार्यात्वयन आणि तामीण व शहरी भागातील संधी निर्मात समान करणे (यामुळे बदल घडवता येईल.

4. **आर्थिक विकास आणि समावेशी समाज** : भारताचा आर्थिक विकासात गरीबाना आणि वंचित घटकांना प्रगतीचा मुख्य प्रवाहात आणण्याची गरज आहे, यासाठी सामाजिक समानता रोजगार निर्मिती आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण यांना महत्व देणे आवश्यक आहे.

**समारोप** :

समृध्दीच्या झगमगाटात असमानतेच्या गडद छाया लपवण्याचा प्रयत्न अनेकदा केला जातो. मात्र, समाजाच्या एका वर्गाच्या प्रगतीला खऱ्या अर्थाने मूल्य प्राप्त होण्यासाठी प्रत्येक नागरिकाच्या मूलभूत गरजा आणि संधीची समानता

आवश्यक आहे. समृध्दीच्या सावलीत दडलेल्या गरिबीच्या आणि असमानतेच्या वास्तवाकडे डोळसपणे पाहणे, आणि केवळ मदतीवर नव्हे तर मूलभूत संरचनात्मक सुधारणा व धोरणात्मक हस्तक्षेपांवर भर देणे गरजेचे आहे. न्याय्य आणि सर्वसमावेशक विकास घडवायचा असेल, तर आर्थिक, शैक्षणिक आणि सामाजिक स्तरांवरील विषमता दूर करण्यासाठी सामूहिक प्रयत्नांची गरज आहे. समृध्दी टिकवायची असेल, तर ती सर्वसामान्यांपर्यंत पोहोचली पाहिजे.

**संदर्भ सूची :**


1. data.gov.in
2. afpd.gov.in
3. mobfw.gov.in
4. abi.gov.in
5. rural.got nic.in
6. NITI-gov.in
7. mospi.gov.in
8. mofapp.nic.in
9. www world bank.org
10. oxfam International Report 2023-24
11. OUTREACH International Report
12. Poverty and Famibes - Amartya sen
13. Development As freedom poverty and income-Amartya sen
14. The poverty of philosophy Karl MARX marx
15. Capital in the Twenty first-eh century (Thomas piktty
16. The Bottom Billion - Paul collier
17. भारतातील गरीबी - निळंकठ रथ आणि वि. म. दांडेकर
18. भारत 2023-24
19. आजकालचा भारत- रजनी पाम-दत्त
20. गरीबी आणि असमानता - डॉ बाबासाहेब आंबेडकर
21. गरीबी कारणे आणि परिणाम – चंद्रकांत गेडाम
22. आधुनिक भारतातील गरीबी आणि असमानता - प्रा के. बी. राव
23. अर्थसंवाद लेख
24. मराठवाडा आर्थिक परिषद लेख


***Cite This Article:***

***आंधळे वि. सु. (2025).*** **समृद्धीच्या सावलीत : गरीबी आणि असमानतेचे वास्तव.** In Aarhat Multidisciplinary International Education Research Journal: Vol. XIV (Number I, pp. 227–233). Doi: https://doi.org/10.5281/zenodo.16419996